**CNR No.MHSI01000723-2024**

## निशाणी ८९ खालील आदेश

अर्जदार यांनी सामनेवाले नं. १४ यांचे कायदेशीर वारसांची दुरुस्ती करणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार व सामनेवाला यांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. अर्जदार यांचे अर्जामध्ये कथन की, सामनेवाले नं. १४ राजाराम रामचंद्र जिकमडे हे निशाणी २२ दि. २१/१०/२०१४ रोजीचे रजिस्टर्ड पोस्टाचे अहवालाने मयत असल्याबाबत समजले. अर्जदार यांनी सामनेवाला यांचे वारसाबाबत माहिती प्राप्त करुन घेतली, परंतु मयत सामनेवाला यांचे मृत्यू दाखला व मृत्यु तारखेबाबत माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. अर्जदार यांना सदर सामनेवाला मयत असलेबाबत नोटीस बजावणी अहवालाने समजले असल्याने सदर सामनेवाला यांचे वारस मुदतीत दाखल करीत आहे. सामनेवाला नं. १४ यांना १४अ, १४ब, १४क, व १४ड, असे कायदेशीर वारस आहेत. सदर वारसांची अर्जाकामी दुरुस्ती होण न्यायोचित असून तसे न झाल्यास अर्जदार यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागणारे आहे. सबब, वारसांची दुरुस्ती निशाणी १ कामी करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. सामनेवाले यांनी अर्जावर म्हणणे देऊन तीव्र विरोध केलेला आहे.

४. अर्जदार यांच्या अर्ज व त्यावरील सामनेवाले यांचे म्हणणे याचा विचार करता अर्जदार यांनी सामनेवाले नं. १४, यांचे वारस अपिलामध्ये समाविष्ट

करणेसाठी अर्ज दाखल केला आहे. सामनेवाले नं. १४, यांचे वारस अपिलाकामी आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे अपिलाचा अंतिम गुणदोषावर निकाल होण्यासाठी अपेलंट यांना संधी देणे योग्य व न्यायाचे होणारे आहे. त्यामुळे अर्जदार याने दिलेले कारण योग्य व संयुक्तिक असल्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्जदार यांचा निशाणी ८९ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार यांना आदेशीत करण्यात येते की, सामनेवाले नं. १४, चे वारस अर्जामध्ये १४ दिवसांच्या आत घेऊन अर्जामध्ये दुरूस्ती करावी व अपिलाची प्रत हजर करावी. तसे न केल्यास अर्ज हा आपोआप रद्द समजण्यात येईल.

SURYAKANT SHANKARRAO INDALKAR

Digitally signed by SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Date: 2026.04.16 17:49:59 +0530

सिंधुदुर्ग – ओरोस
दिनांक : १६/०४/२०२६

(एस्. एस्. इंदलकर)
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ व
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
सिंधुदुर्ग–ओरोस.